# श्री. मनोजकुमार खैरनार, अपर जिल्हाधिकारी, वर्धा यांचे कार्यालय

प्र.क्र. 17/एनएपी-34/2020-21
मौजा :- कारंजा घा.ता. कारंजा घा, जि. वर्धा
दिनांक : 19 मे, 2022

## अनुसूची पाच
**(नियम 7 पहा)**

## नियोजन प्राधिका-याच्या अधिकारितेत असलेल्या जमिनीच्या धारकाला दयावयाच्या सनदेचा नमुना

ज्याअर्थी, वर्धा जिल्हयाच्या **कारंजा घा** तालुक्यातील मौजा **कारंजा घा. भु-मापन क्रमांक** 1231 चे भोगवटदार असलेले वर्धा येथील रहिवासी **श्री.असिफ अकबर हुसैन, रा. महादेवपुरा,वर्धा** यांनी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, 1966 च्या कलम 44 अन्वये, यासोबतच्या परिशिष्ट एक मध्ये वर्णन केलेला भु-मापन क्रमांक 1231 चा भाग असलेल्या व **आराजी 1.34 हे.आर.** क्षेत्रफळ असलेला **निवासी** प्रयोजनासाठी वापर करण्याच्या परवानगीकरीता वर्धा जिल्ह्याच्या अपर जिल्हाधिकारी यांचेकडे अर्ज सादर केला.

त्याअर्थी, आता, असे प्रमाणित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या उपबंधास अधीन राहून, आणि पुढील शर्तीवर उक्त भु-खंड **निवासी** प्रयोजनासाठी वापरण्याची परवानगी देण्यात येत आहे.

(1) **जमिन समतल करणे व ती साफ करणे** :- ज्यासाठी परवानगी देण्यात आली आहे, त्या विशिष्ट अकृषिक प्रयोजनास योग्य होण्यासाठी आणि आरोग्यविघातक परिस्थितीस प्रतिबंध होण्यासाठी जमीन पुरेशी समतल करण्यास व साफ करण्यास अर्जदार बांधलेला असेल.

(2) **आकारणी** :- उक्त जमीनीचा धारक उक्त जमीनीच्या संबंधात या अगोदर वसुलीयोग्य असलेल्या आकारणी ऐवजी अर्जदार शासनाला प्रत्येक वर्षी 31 जुलै रोजी संपणाऱ्या हमीच्या कालावधीत गैरकृषी आकारणी रुपये 0.90 पैसे प्रती चौ.मी. प्रमाणे रूपये 12060.00 वार्षिक आकारणी व रुपांतर कर **(5 पट)** रुपये **60300.00**, **(एकदा)** देईल आणि उक्त कालावधी संपल्यानंतर उक्त संहिते अन्वये मा. जिल्हाधिकाऱ्यांकडुन वेळोवेळी निश्चित करण्यात येईल अशी सुधारीत आकारणी देईल.

(3) **वापर** :- अर्जदाराने **निवासी** या व्यतिरिक्त असलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी जमिनीचा आणि तिच्यावर उभारलेल्या किंवा उभारावयाच्या इमारतीचा वापर **अपर जिल्हाधिकारी याच्या** पूर्वमंजुरी शिवाय करता कामा नये.

अर्जदाराने, यासोबतच्या **परिशिष्ट दोन** मध्ये असलेल्या शर्तीचे यथोचितरीत्या पालन केले पाहिजे.

(4) **बांधकामाबाबतची कालमर्यादा** :- अर्जदाराने या अधिकारपत्राच्या तारखेपासून तीन वर्षाच्या आत उक्त भू-खंडावर भरीव व कायम स्वरुपाचे **निवासी** वापर सुरु केले पाहिजे, तसे न केल्यास अपर

अपर जिल्हाधिकारी वर्धा

जिल्हाधिका-यांकडून वेळोवेळी मुदत वाढविण्यात आली नसेल तर देण्यात आलेली परवानगी व्यपगत झाल्याचे समजण्यात येईल.

(5) **पटटी देण्याबाबतचे दायित्व** :- अर्जदाराने, उक्त जमिनीवर आकारण्याजोगे सर्व कर, पटया आणि उपकर दिले पाहिजे.

(6) **शास्तीविषयीचा खंड** :-

(अ) अर्जदाराने पूर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास, उक्त अधिनियमाच्या उपबंधान्वये अर्जदार ज्या शिक्षेस पात्र होईल अशा इतर कोणत्याही शिक्षेस बाध न आणता, **अपर जिल्हाधिका-यास** तो निर्देशित करील अशी आकारणीची रक्कम व उक्त **अधिनियमाचे कलम 329 चे पोटकलम** (2) ला अधीन राहून तो निर्देशित करील असा दंड भरल्यावर उक्त भू-खंड, अर्जदाराच्या ताब्यात ठेवण्याचे चालू ठेवता येईल.

(आ) **उप-खंड (अ)** मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिकारपत्राच्या उपबंधाविरुध्द कोणतीही इमारत किंवा बांधकाम उभारण्यात आल्यास किंवा वापरण्यात आल्यास **अपर जिल्हाधिका-यांने** विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत काढून टाकण्याबाबत किंवा त्यात बदल करण्याबाबत, अपर जिल्हाधिका-याने निदेश देणे वैध असेल आणि विनिर्दिष्ट मुदतीत अशा प्रकारे (**इमारत किंवा बांधकाम**) काढून टाकण्यात आले नाही किंवा त्यात बदल करण्यात आला नाही तर, त्याला ते काढून टाकण्याची किंवा त्यात बदल करण्याची व्यवस्था करता येईल आणि त्याबाबतचा खर्च अर्जदाराकडून जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करता येईल.

(7) **अधिनियमाचे उपबंध लागू असणे :- यात उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त हे अधिकारपत्र उक्त अधिनियमाच्या आणि त्याखालील नियमांच्या उपबंधास अधीन असेल.**

महाराष्ट्र जमिन महसुल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) **नियम, 1969 मधील सर्व तरतुदी अर्जदाराला बंधनकारक राहील.**

<u>नकाशा</u>

<u>परिशिष्ट एक</u>

| लांबी व रुंदी | पृष्ठभागाचे एकूण क्षेत्रफळ | सीमा | शेरा |
|---|---|---|---|
| उत्तर-दक्षिण<br>पूर्व-पश्चिम | | उत्तर-दक्षिण<br>पूर्व-पश्चिम | |
| प्रकरणातील नकाशा प्रमाणे | TOTAL AREA UNDER LAYOUT -**13400.00** **SQM.** (1.34 H.R.)<br>TOTAL AREA UNDER PLOT - **5894.72 Sqm**<br>AREA UNDER OPEN SPACE **1351.45 Sqm.**<br>AREA UNDER AMENITY PLOT **1346.06 Sqm.**<br>AREA UNDER ROADS **4807.77 Sqm.** | नगर रचनाकार वर्धा यांनी त्यांचे पत्र जा.क्र.अकृषक/मौ. कारंजा घा /ता.कारंजा घा /स.क्र.1231/ससंनरव/1210 दिनांक 02.05.2022द्वारे मंजूरीची शिफारस केलेल्या प्रकरणातील नकाशा प्रमाणे | |

# परिशिष्ट दोन

हे अधिकारपत्र पुढील विशेष शर्तीस अधीन राहील. प्रकरणांत खालील विभागांचे नाहरकत प्रमाणपत्र / अभिप्राय प्राप्त झालेले आहेत :-

1. **उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, आर्वी** यांचे पत्र क्र. जा. क्र. 2621/2021 दिनांक 04.10.2021 अन्वये मौजा कारंजा घा. येथील शेत स.क्र. 1231 क्षेत्रफळ 1.34 हे.आर प्रस्तावित जागा या विभागाचे याअधिपत्या खालील कोणत्याही रस्त्यालगत येत नसल्यामुळे तरी मुख्याधिकारी नगर पंचायत,कारंजा घा यांचेकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त असा अहवाल सादर केलेला आहे.
2. **जिल्हा स्वास्थ अधिकारी, वर्धा** यांचे पत्र क्रमांक 1420 दि. 09.08.2021 नूसार अनुकूल अभिप्राय सादर केलेला आहे.
3. **उपजिल्हाधिकारी भूसंपादन, वर्धा** यांचे पत्र क्रमांक 230 दि. 29.10.2021 नूसार नाहरकत प्रमाणपत्र सादर केलेले आहे. परंतू, शासनाच्या लोकहितार्थ प्रकल्पासाठी सदर जमिन यापुढे भूसंपादनाखाली आल्यास किंवा खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी करावयाची असल्यास नियमाप्रमाणे जमिनीचा अकृषक वापर सुरु केला नसल्यास पडीत शेत जमिनीचे दर लागू राहील. अकृषक दर देय राहणार नाही, अशी अट अकृषक परवानगी मध्ये नमूद करण्यात यावी या अटीवर नाहकरत प्रमाणपत्र सादर केलेले आहे.
4. **उपजिल्हाधिकारी पूनर्वसन, वर्धा** यांचे पत्र जा.क्र.कलि/पुनर्व/अकृषक/कावि-281/2021, दिनांक 17.09.2021 अन्वये मौजा कारंजा घा हे गांव महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियम 1976/1986/1999 लांगू असलेल्या जिल्हयातील कोणत्याही प्रकल्पाचे बाधित व लाभ क्षेत्रात समाविष्ट नाही व सदर जमीन सद्यस्थितीत पुनर्वसन करीता प्रस्तावित नसल्याबाबत अहवाल सादर केलेला आहे.
5. **कार्यकारी अभियंता, सं व सु विभाग, म.रा.वि.वि.कं. मर्या. आर्वी** यांनी त्यांचे पत्र क्र. काअ/संवसु/वर्धा/तांत्रिक/अकृषक/1819 दिनांक. 17.05.2022 नूसार मौजा कारंजा घा ता.कारंजा घा येथील निवासी परिवर्तन झाल्यानंतर नागरी सुविधा पुरविण्यासाठी विज पुरवठा प्राप्त करण्याकरीता आवश्यक असलेल्या रोहीत्रा करीता म.रा.वि.वि. कंपनी मर्या. यांना 5मी X 5मी. ची जागा 99 वर्षाचे मुदतीसाठी कंपनीसोबत प्रतिवर्ष रु. 1/- या दराने भाडे तत्वावर देण्याचा कायदेशीर करार करणे आवश्यक असून संपूर्ण पायाभूत सुविधेकरीता अंदाजपत्रकाप्रमाणे आवश्यक त्या रकमेचा भरणा या कार्यालयास ताबडतोब करणे लेआऊट धारकास बंधनकारक राहील या अटीवर अर्जदारास निवासी प्रयोजनाकरीता नाहकरत पत्र देण्यास हरकत नसल्याचे अहवाल सादर केलेला आहे.
6. **तहसिलदार कारंजा घा.** यांचे पत्र क्रमांक 467 दि. 13.12.2021 नूसार तलाठी यांचे मुदेनिहाय अहवालशी सहमत असल्याबाबत कळविलेले आहे
7. **मुख्याधिकारी नगर पंचायत कारंजा** यांनी त्यांचे पत्र जाक्र./नपंका/329/2021 दि. 25.10.2021 नूसार खालील अटींच्या अधिन राहून नाहरकत प्रमाणपत्र सादर केलेले आहे.
   1. सीमांकन व अभिन्यास विकसनकरिता निर्गमित करण्यात आलेल्या आदेशातील संपूर्ण अटी शर्तीचे पालक करणे अर्जदारास बंधनकारक राहील.
   2. विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतुदींच्या अनुषंगाने नगरपंचायत क्षेत्रातील जमिनी निवासी प्रयोजानार्थ अकृषक शिफारस करतांना वार्षिक मुल्यदराच्या 5% अधिमुल्य अर्जदाराकडून भरुन घेणे आवश्यक आहे.सबब सदर अधिमुल्य नगरपंचायत कार्यालयात भरणा केल्याची पावती अकृषक आदेशापुर्वी सादर करणे अर्जदारास बंधनकारक असेल.
   3. मा.नगर रचनाकार,वर्धा यांची सदर जमिनीचे सीमांकन व अभिन्यास विकसनकरिता नाहरकत प्राप्त करुन घेणे अर्जदारास बंधनकारक असेल.

4. रिबन डेव्हलपमेंट रुल चे पालन करणे संबंधीत सर्वे क्रमांकच्या मालकास बंधनकारक राहील.
5. संबंधित जमिनीतील इतर सह कब्जेदार/वरिष्ठ भूधारक/कुळे/व्यक्ती यांची असे अकृषक ओदश प्राप्त करुन घेणेबाबत हरकत नसल्याचे लेखी संमितपत्र अकृषक आदेशपूर्वी सादर करणे बंधनकारक असेल.
6. संबंधीत सर्वे क्रमांक मधील कुठल्याही भागाची खरेदी विक्रीची नोंदणी ,अंतिम अभिन्यास मंजुरी शिवाय अर्जदार तसेच सदर सर्वे क्रमांक अर्जदार मार्फत कुठल्याही मार्गाने हस्तांतरीत झालेल्या व्यक्तीस कुठल्याही सक्षम प्राधिकारणकडे करता येणार नाही.
7. अभिन्यासातील कोणत्याही भूखंडावर बांधकाम/विकास करणेपुर्वी अ,ब,क,वर्ग नगर परिषदांना लागू असलेल्या प्रचलित इमारत उपविधी व विकास नियंत्रण निमयावली प्रमाणे या कार्यालयाची परवानगी घेणे बंधनकारक असेल.
8. संबंधीत सर्वे क्रमांक निवासी प्रयोजनाकरीता स्वास्थ व स्वच्छतेचे दृष्टीकोनातुन योग्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घेणे अर्जदारास बंधनकारक असेल तसेच सदर प्रकारचे नाहरकत प्रामणपत्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त करुन घेणे बंधनकारक असेल.
9. संबंधित स.क्र. पुनर्वसनाकरीता प्रस्तावित नसल्याचे तसेच भूसंपादन प्रकरणात अंतर्भूत नसल्याचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घेणे अर्जदारास बंधनकारक असेल.
10. संबंधित स.क्र. मधून एलटीएचडी लाईन, ट्रान्सफॉर्मर, डीपी अस्तित्वात/प्रस्तावित नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घेणे अर्जदारास बंधनकारक असेल.
11. संबधित स.क्र.. मधून किंवा लगतच्या जमीनीतून पाण्याचे स्त्रोत जात असल्यास संबंधित पाटबंधारे / जलसिंचन विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे अर्जदारास बंधनकारक असेल.
12. संबंधित स.क्र. वर असलेली वृक्ष नष्ट न करता विद्यमान स्थितीत कायम ठेवून त्यांचे संगोपन करणे अर्जदारास बंधनकारक असेल.
13. संबंधित स.क्र. मधील जागा इतर कोणासही हस्तांतर करुन दिलेली नाही तसेच त्या क्षेत्रासंबंधी इतर अधिकाराने पावर ऑफ अटर्नी अथवा इतर कोणत्याही प्रकारे निर्माण होणाऱ्या त्रीपक्षीय हितसंबंधास अथवा हस्तांतरणास अर्जदार वैयक्तिक जबाबदार राहील. याबाबतचे प्रतिज्ञापत्र अर्जदाराने सादर करणे बंधनकारक राहील.
14. सदर स.क्र. वरील जमीन अर्जदाराकडे खरेदी ने आली असल्यास खरेदीच्या वेळी अर्जदार शेतकरी असल्याबाबत पुरावा व शेतकरी नसल्यास कुळ कायदा 83 खाली खरेदी कामी संबधीत सक्षम प्राधिकरणाची परवानगी घेतलेल्या आदेशाची साक्षांकित प्रत अकृषक आदेश प्राप्त करुन घेण्यापूर्वी सादर करणे अर्जदारास बंधनकारक राहील.
15. सदर स.क्र. मध्ये जागेसंदर्भात भविष्यात धारणाधिकाराच्या अनुषंगाने बदल झाल्यास त्यासाठी प्रचलित तरतूदी नूसार शासनास देय असणारी नजराण्याची व अन्य कोणतीही रक्कम रितसर भरण्यास अथवा कोणत्याही न्यायालयात वाद उद्भवल्यास किंवा नागरी जमीन कमाल धारणा कायद्याखाली नियुक्त केलेल्या सक्षम प्राधिकारी अथवा कोणत्याही सक्षम प्राधिकारीकडे वाद उत्पन्न झाल्यास त्यास अर्जदार वैयक्तिक जबाबदार राहतील याबाबतचे क्षतिपत्र अर्जदाराने सादर करणे बंधनकारक राहील.

वरीलपैकी कुठल्याही अट व शर्तीची पूर्तता न केल्यास किंवा उल्लंघन केल्यास तसेच जागेच्या हद्दी व क्षेत्रफळ, मालकी हक्क तसेच पोच रस्ता बाबत तफावत अथवा काही वाद उपस्थित झाल्यास हे नाहरकत पत्र रद्द समजण्यात यावे.या अटीवर अर्जदारास निवासी प्रयोजनाकरीता नाहरकत पत्र देण्यास हरकत नसल्याचे कळविलेले आहे.

अपर जिल्हाधि...

184

8. **नगर रचनाकार वर्धा** यांनी त्यांचे पत्र जा.क्र.अकृषक/मौ.कारंजा घा./ता. कारंजा घा./स.क्र. 1231 ससंनरव/1210, दिनांक 02/05/2022 अन्वये मौजा कारंजा घा. येथील शेत सर्व्हे नंबर 1231 आराजी 1.34 हे.आर. म्हणजेच 13400 चौ.मी. जमीनीचे सिमांकित अभिन्यासाला खालील अटींवर मंजूरीची (Recommended for Approval) शिफारस केली आहे.

1. उक्त अभिन्यासातील रस्त्याचे खडीकरण, नालीचे बांधकाम व इतर विकास योग्य प्रकारे झाला असल्याबाबतची खात्री आपल्या स्तरावरुन करुन घ्यावी. त्यानंतरच अंतिम आदेश पारीत करण्यांत यावा.
2. अभिन्यासातील खुली जागा, सुविधा क्षेत्र व रस्ते या व्यतिरिक्त इतर सर्व भुखंडाचा उपयोग निवासी प्रयोजनार्थ करण्यांत यावा
3. अभिन्यासातील खुली जागेबाबत एकिकृत विकास नियंत्राण व प्रोस्ताहन नियमावलीतील विनियम क्रमांक 3.4.2 मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.
4. एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम क्रमांक 3.3.11 मधील तरतुदीनुसार अर्जदार विकासक यांनी अभिन्यासातील रस्ते विकसित करुन नियोजन प्राधिकरणास विनामुल्य हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील.
5. एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोस्ताहन नियमावलीचे विनियम क्र.2.7.2 नुसार अभिन्यासातील रस्ते,नाली पाण्याची व्यवस्था, कल्व्हर्ट्र,पुल,रस्त्याचे बाजुस विजेचे पोल व इतर आवश्यक सार्वजनिक सुविधा विकसति करणे आवेदकावर बंधनकारक राहील.तसेच अभिन्यासातील सदर विकास कामे पूर्ण करुन ती संबंधित नियोजन प्राधिकरणास हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील.
6. अर्जदार / जमीन मालक यांनी स्वखर्चाने भूखंडधारकांना पुरेल इतक्या पाण्याची व्यवस्था करावी.
7. अभिन्यासातील भूखंडावरुन विद्युत दाब वाहिनी गेली असल्यास आवेदकाने /विकासकाने स्वखर्चाने रस्त्याचे कडेला स्थलांतरीत करावी.
8. अभिन्यासात सार्वजनिक पाणी पुरवठयाची व सांडपाण्याची प्रक्रीया करुन विल्हेवाट करण्याची व्यवस्था जमीन मालक / विकास यांनी स्वत:चे खर्चाने करणे आवश्यक राहील.
9. सदर जागेवर पिण्याचे पाण्याची उपलब्धता असल्याबाबत संबंधीत विभागाचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.
10. अभिन्यासातील भूखंडात बांधकाम करतांना क्षेत्राकरीता लागू असणा-या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियम लागू असलेल्या बांधकाम विषयक नियमाचे पालन करावे. इतर बाबतीत स्थानिक प्राधिकरणाचे नियमाचे पालन करावे.
11. सदर जागेतील वृक्षांचे संरक्षण करुन प्रत्येक भूखंड धारकाने वृक्षांचे संवर्धन करावे.
12. सदर शिफारस ही आवेदकाच्या मालकीच्या जागेपूरतीच मर्यादीत असून, आवेदकाच्या मालकीच्या नसलेल्या जागेचा विकास करण्याकरीता ही शिफारस लागू होणार नाही.
13. पावसाचे पाण्याचे जलसंवर्धन (Rain Water Harvesting) ची व्यवस्था अभिन्यासात करावी लागेल
14. विषयांकित जागेच्या अभिन्यासामधील भूखंडावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम सुरु करण्यापूर्वी अर्जदारास बांधकाम नकाशे स्थानिक नियोजन प्राधिकरणाकडून मंजूर करुन घेणे आवश्यक राहील.
15. भविष्य काळात अभिन्यासातील भूखंडाचे विभाजन करु नये.
16. महाराष्ट्र लँड रेव्हेन्यु रुल्स 1969(जमिनीच्या वापरातील बदल व अकृषिक कर आकारणी) च्या कलम 4 च्या अटीचे पालन करावे
17. जागेचे मालकी हक्क, अभिन्यासाच्या हद्यी व क्षेत्रफळाबाबत तसेच पोचरस्त्याबाबत तफावत अथवा काही वाद उपस्थित झाल्यास ही शिफारस रद्य समजण्यांत यावी.

18. सदर प्रकरणी प्रस्तावित सार्वजनिक सुविधेचे क्षेत्रामध्ये नियमानुसार R-1 विभागात अंतर्भुत सार्वजनिक सुविधेचे वापर अनुज्ञेय राहील.
19. सदर प्रकरणी अभिन्यास नकाशात दर्शविल्याप्रमाणे संबंधीत पाटबंधारे विभागाचे प्रमाणकानुसार नाल्यावर Culvert चे बांधकाम करणे अर्जदार/विकासकर्ता यांना बंधनकारक राहील.
20. वरील अटींची पुर्तता होताना अभिन्यासात फेरबदल झाल्यास सुधारीत अभिन्यासास मंजूरी प्राप्त करुन घ्यावी लागेल.
21. नगर रचना कार्यालयाचे पत्र दि. 14.01.2022 मधील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.
22. सदर प्रकल्पाची महारेराकडे (Maha RERA) नोंदणी करणे अर्जदार/विकासक यांना बंधनकारक राहील.
23. अर्जदार यांनी अधिमुल्यांचे 5% रक्कमेपैकी 50% हिस्सा नगर रचना विभाग,वर्धा यांना तसेच नगरपंचायत कारंजा घा यांना 50% रक्कमचा भरणा पावती क्रमांक 6357 दि.30.03.2022 अन्वये केलेला आहे.

**तसेच अर्जदारास खालील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.**

1. नगर रचनाकार, वर्धा यांचे अंतिम शिफारशीमध्ये नमूद अटी व शर्तीचे पालन करणे अर्जदारास बंधनकारक राहील.
2. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 अन्वये नगर रचनाकार / स्थानिक **नियोजन प्राधिकरण / मान्यता दिल्याप्रमाणे बांधकाम केले पाहिजे.**
3. अर्जदाराने इमारतीच्या प्रमाणाचे आणि नियंत्रण रेषांचे पालन केले पाहिजे. सोबतच्या **नकाशातील चिन्हांकित केलेले क्षेत्र मोकळी जागा म्हणून ठेवले पाहिजे.**
4. सदर रस्त्याच्या बाजुला शासकीय जागेत कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होणार नाही याची जबाबदारी संपुर्णपणे अर्जदारावर राहील.
5. भुखंडावर बांधकाम करते वेळी सक्षम प्राधिकरणाची परवानगी घेणे अर्जदारास बंधनकारक राहील.
6. सदर जमिनीला लागुन असलेल्या जमिन धारकाचे सुविधाधिकार बाधीत करण्यात येवू नये.

**या गोष्टीची साक्ष म्हणून अपर जिल्हाधिका-याने महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने आपली सही केली आहे आणि आपल्या पदाची मोहोर लावली आहे आणि अर्जदाराने सुध्दा यावर आज दिनांक** 19 **मे, 2022 रोजी सही केली आहे.**

Asif A. Hussain.

**श्री.आसिफ अकबर हुसैन**
रा. महादेवपूरा वर्धा ता. जि. वर्धा
**(अर्जदारांची सही)**

अपर जिल्हाधिकारी वर्धा

**(मनोजकुमार खैरनार)**
अपर जिल्हाधिकारी, वर्धा

आम्ही असे जाहीर करतो, की जिने या सनदेवर सही केली आहे ती **आसिफ अकबर हुसैन रा.महादेवपूरा वर्धा** ही व्यक्ती आमच्या वैयक्तिक माहीतीप्रमाणे ती जी व्यक्ती असल्याचे म्हणत आहे तीच व्यक्ती आहे आणि तिने आमच्या समक्ष आपली सही केली आहे.

(साक्षीदारांच्या सहया व पदनाम)

1. मनोहर ... गायकवाड

2. ------------------

**प्रतिलीपी :-** Vivek P. Datey

1. उपविभागीय अधिकारी, आर्वी
2. तहसिलदार, कारंजा घा
3. उप अधिक्षक भुमी अभिलेख, कारंजा घा यांना माहितीकरीता अग्रेषित.
4. तलाठी मौजा कारंजा घा ता. कारंजा घा जि. वर्धा यांनी गांव नमुना-2 मध्ये नोंद घेऊन २० दिवसाचे आत या कार्यालयास कळवावे. तसेच या परवानगीतील अटी व शर्तीचा भंग केल्याचे आढळून आल्यास वेळोवेळी तसा अहवाल तहसीलदार कारंजा घा व उपविभागीय अधिकारी, आर्वी यांना सादर करावा.
5. मुख्याधिकारी, नगर पंचायत, कारंजा घा. यांना माहिती करीता.
6. अर्जदार **आसिफ अकबर हुसैन रा.महादेवपूरा वर्धा**, ता.जि.वर्धा यांना आवश्यक कार्यवाहीस.

**अपर जिल्हाधिकारी,वर्धा**

अपर जिल्हाधिकारी, वर्धा